# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस षासन षिक्षण विभागाची अधिसूचना कमांक 513 दिनांक 1 ऑगष्ट 1923
द्वारा स्थापित व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

## (गोपनिय विभाग)

परीक्षा भवन, एल. आय. टी. परिसर, अमरावती रोड, नागपूर – 440033
दुरध्वनी क्र. 0712–2523298, 6566875 फॅक्स क्र. 0712–2546263

क्र. गोपनिय / 104 दिनांक : 02 –02–2016

प्रति,

प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख,
सर्व संलग्नीत संचालीत महाविद्यालये
तसेच विद्यापीठाचे पदव्युत्तर विभाग

**विशय :–** उन्हाळी 2016 च्या प्रात्यक्षिक परीक्षा तसेच सेषनल गुणांबाबत.

**महोदय / महोदया,**

आपणांस कळविण्यात येते की, उन्हाळी 2016 च्या प्रात्यक्षिक परीक्षा खालील कालावधीत आपल्या महाविद्यालयात आयोजित करावयाच्या आहेत,

1. पदवी परीक्षा अ) प्रथम व तृतीय वर्ष दिनांक 10 / 02 / 2016 ते 24 / 02 / 2016
ब) द्वितीय व ईतर दिनांक 25 / 02 / 2016 ते 14 / 03 / 2016

2.पदवी, पदव्युत्तर सत्रपध्दती परीक्षा
अ) सर्व परीक्षा दिनांक 15 / 03 / 2016 ते 05 / 04 / 2016

आपल्या महाविद्यालयात वर नमुद वर्गाची प्रात्यक्षिक परीक्षा उपरोक्त कालावधीत कोणत्या तारखेस आयोजित करावयाची तारीख तसेच अंतर्गत परीक्षकांची नावे दिनांक 08 / 02 / 2016 पर्यंत गोपनीय विभागास विशेष दुतामार्फत कळवुन त्यांची पोच घ्यावी.

तसेच सर्व परीक्षेचे सेशनल गुण पत्रके हे लेखी परीक्षा सुरू होण्याच्या 10 दिवस आधी ऑनलाईन college.rtmnuresults.org या संकेत स्थळावर विद्यार्थ्यांचे क्रमांकासहित पाठवुन त्याची हार्ड कॉपी गोपनीय विभागास सादर करून त्याची पोच घ्यावी. ठराविक वेळेनंतर आलेले सेशनल गुण परीपत्रक क्रमांक 1252 दिनांक 08 / 11 / 2006 नुसार प्रती दिन रू. 1000 /– प्रमाणे दंड आकारण्यात येईल. तसेच ज्या महाविद्यालयात एकही विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षक नाही. अषा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण महाविद्यालयाच्या (संस्थेच्या) अध्यक्ष किंवा सचिव यांना प्रदान करता येणार नाही. ज्या महाविद्यालयामध्ये विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षक नसलेल्या महाविद्यालयांनी अध्यक्ष किंवा सचिवांच्या स्वाक्षरीने अंतर्गत गुण विद्यापीठाकडे सादर करू नयेत.

त्याचप्रमाणे आपल्या महाविद्यालयात संबंधित वर्गाची प्रात्याक्षिक परीक्षा संपल्यावर, त्याचे गुणपत्रक ऑनलाईन college.rtmnuresults.org या संकेत स्थळावर पाठवुन त्याची हार्ड कॉपी अंतर्गत व बाहय परीक्षकांच्या स्वाक्षरीनिशी मोहरबंद लिफाफ्यात पुढील 24 तासाच्या आत गोपनीय विभागास विशेष दुतामार्फत त्यावर परीक्षेचे नांव, वर्ष, वर्ग, प्रात्यक्षिक परीक्षेचा विषय इत्यादी नमुद करून सादर करावे, अन्यथा प्रात्यक्षिक परीक्षांच्या गुणांचे मोहरबंद लिफाफे स्वीकारल्या जाणार नाही.

कृपया वरील बाबींची नोंद घेवून योग्य कार्यवाही करावी.

आपला

(डॉ. निरज खटी)
परीक्षा नियंत्रक
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर

प्रतिलीपी माहितीकरीता व कार्यवाहीस्तव सादरः–